महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/संकीर्ण/२०२३/ 3380 दिनांक : 01 AUG 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
उपसचिव,
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :- " ३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत..**

**संदर्भ :-** म. शा. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शा. नि. क्र. संकीर्ण-८२२१/प्र.क्र.४५९/सां.का.४ दि. २४ जूलै, २०२३.

संदर्भीय शासन निर्णयान्वये "३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या या संदर्भीय शासन निर्णयामधील परिशिष्ट- "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या विशेष बोधचिन्हाचा (Logo) शासनाच्या सर्व शासकीय कार्यक्रमाच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करण्यात यावे याबाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय संस्थाप्रमूख/कार्यालयप्रमुख यांना कळविण्यात येते की या परिपत्रकासोबत जोडलेल्या शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

सोबत : शासन निर्णय.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. ४५९/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०२३

**प्रस्तावना :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या विशेष बोधचिन्हाचे लोकार्पण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनांमनात व्हावा, जगभरात जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे तेथे या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी, हा या मागील उद्देश आहे. त्यानुषंगाने, राज्य सरकारच्या माध्यमातून वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारात सदर बोधचिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या परिशिष्ट - "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या विशेष बोधचिन्हाचा (Logo) शासनाच्या सर्व शासकीय कार्यक्रमाच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करण्यात यावा. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सदर बोधचिन्ह चित्रित करण्यात यावे. सदर बाब सर्व मंत्रालयीन/प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७२४१७३५५५७९२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TO CULTURAL AFFAIRS DEPARTMENT,
2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b7 3a0cfb9a57fc6ce6, postalCode=400032, st=Maharasht serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97 926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THO
Date: 2023.07.25 18:24:23 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई

४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा यांचे खाजगी सचिव
९. राज्यातील सर्व सन्माननीय संसद व विधान मंडळ सदस्य
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, यांचे स्वीय सहाय्यक
१२. सर्व अपर मुख्य सचिव / मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१४. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगर पालिका / मुख्याधिकारी, नगर पालिका
१५. सर्व क्षेत्रीय कार्यालये (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१७. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई ४०० ०३२
१९. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२०. निवड नस्ती, सां.का.४.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-८२२३/ प्र.क्र.४५९/सां.का.४, दिनांक २८ जुलै, २०२३ सोबतचे

"परिशिष्ट - अ"

